MANGO RESEARCH SUB CENTRE
RAMESHWAR, Po. Vijaydurg,
Tal. Deogad, Dist. Sindhudurg
Mobile : 9370975818

www.dbskkv.org
mrscrameshwar@gmail.com

आंबा संशोधन उपकेंद्र
रामेश्वर, पो. विजयदुर्ग,
ता.देवगड, जि. सिंधुदुर्ग
भ्रमणध्वनी : ९३७०९७५८१८

जा.क्र. आंसंऊके/रामेश्वर/दरपत्रक/२९३ /२०२३ दिनांक : ३१ .०८.२०२३

प्रति,

............................
............................
----------------------------
----------------------------

विषय: आंबा संशोधन उपकेंद्र,रामेश्वर येथील प्रक्षेत्रावरील मजूर पदाची विविध कामे ठेका पद्धतीने काम करण्यासाठी इच्छुक ठेकेदारांनी दरपत्रक देण्याबाबत

महाशय,

आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग या कार्यालयाच्या प्रक्षेत्रावरील माहे सप्टेंबर २०२३ ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीमधील मजूर पदाची विविध कामे ठेका पद्धतीने करून घेणे प्रस्तावित असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल |
|---|---|
| १ | नवीन आंबा लागवडीमधले गवत काढणे, उचलणे,झुडपे, वेली तोडणे, साफसफाई करणे तसेच पावसाळा संपल्यावर पाणी देणे. |
| २ | गट क्र. ६,११, १७ व १८ मधले गवत काढणे, उचलणे, झुडपे वेली तोडणे,साफसफाई करणे तसेच वाळलेल्या रोगट फांद्या काढणे व बांडगुळ काढणे. |
| ३ | कार्यालयीन कामे करणे. तसेच विविध प्रायोगिक कामासाठी मदत करणे व इतर कार्यालयीन कामात मदत करणे. |

उपरोक्त तपशिलाप्रमाणेची मजूर पदाची कामे ठेकापद्धतीने करून देण्यासाठी पुरविण्यास इच्छुक ठेकेदाराने आपण प्रती दिन व प्रती युनिट काय दराने मजूर पुरवाल हे या कार्यालयास दि. ०७/०९/२०२३ पर्यंत सिलबंद पाकिटातून कळवावे. कामासंबधीची अटी व शर्ती ज्यांना मान्य असतील अशा कंत्राटी मजुरांनी/ व्यक्तींनी दरपत्रके द्यावयाची आहेत.

उद्यानविद्यावेत्ता
आंबा संशोधन उपकेंद्र,रामेश्वर,
ता. देवगड जि. सिंधुदुर्ग.

प्रत माहितीसाठी :

१. मा. तहसिलदार, तहसिलदार कार्यालय, देवगड, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.
२. मा. सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, रामेश्वर, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.
३. मा. सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, विजयदुर्ग, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.
४. मा. सरपंच, ग्रामपचायत कार्यालय, गिर्ये, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.
५. नोटीस बोर्ड, आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर.

# ठेका पध्दतीने करावयाच्या कामासाठीचे शर्ती व अटी

1- प्रक्षेत्रावरील कामे संबधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

2- ठेकेदाराने पुरविण्यात येणाऱ्या कामगाराचे वय हे १८ वर्षापुढील व ६० वर्षापर्यंतच असावे.

3- कामाच्या देयकाची आदायगी महिना पूर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी विभाग प्रमुख / प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पूर्ण केल्याबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

4- निविष्ठांचा पुरवठ्या विभागामार्फत केला जाईल.

5- ठेकेदाराने स्वत: चे पन कार्ड व बँक खाते असणे आवश्यक आहे, तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्या अनुपंगिक रक्कम संबधित कामगारांच्या बँक खाती जमा करणे आवश्यक आहे.

6- ठेकेदाराने नेमलेल्या मजुरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

7- प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

8- ठेक्यामध्ये असलेल्या मजुरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर विहित कार्यपद्धती अवलंबून नेमण्याचा अधिकार संबधित विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना राहील.

9- ठेक्यातील मजुरांची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चित केलेली असावी.

10- याचिका क्र. १५१९१ / २०१८ संदर्भात मा.उच्च न्यायलय मुंबई यांच्या दिनांक १८ एप्रिल २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क्र. ५१ (ई) नुसार याचिकाकर्त्या मजुरांना ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

11- ठेकेदारमार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

12- ठेकेदार व्यक्तीस / संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

13- ठेक्यासंबंधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुखांना विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

14- ठेक्यातील मजुरांचा पोष्टाच्या कार्यालयाकडून PLI काढणे आवश्यक आहे.

उद्यानविद्यावेत्ता
आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर,
ता. देवगड जि. सिंधुदुर्ग.